# मुंबई येथील बीडीडी चाळींचा पुनर्विकास प्रकल्पाची सद्यस्थिती

दि. १५/०४/२०२५

## मुंबई येथील वरळी बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्प:-

- पुनर्वसन इमारत क्र.-१ ने बाधित होणाऱ्या सर्व चाळ क्र. ३० ते ४० (११ चाळी) रिकाम्या करुन जमीनदोस्त करण्यात आल्या असून त्याप्रमाणे पुनर्वसन इमारत क्र. १ चे संपुर्ण काम (८ विंग व व्यापारी संकुल) प्रगतीपथावर आहे..
- पुनर्वसन इमारत क्र. ६ मधील चाळ क्र. ९०,९१, ९२, ९३, १०४, १०८ व १०९ या सहा चाळी जमीनदोस्त करण्यात आले आहे.
- सुधारित आराखड्यानुसार टप्पा क्र. १ मधील पुनर्वसन इमारत क्र. १ मधील एकूण ८ विंग पैकी एकूण ७ (बी,सी,डी,इ,एफ,जी व एच) विंगचे ४० मजल्यापर्यंतचे आरसीसी बांधकाम पूर्ण झाले असून इमारतीच्या आतील फिनिंशिग वर्क प्रगतीपथावर आहे. यापैकी विंग "डी " व " ई " या दोन इमारतीमधील सदनिकाचा ताबा संबंधित रहिवाशी/ भाडेकरु यांना लवकरच देण्याचे नियोजित आहे. तसेच विंग ए या इमारतीच्या ३७ व्या मजल्यापर्यंतचे आरसीसी बांधकाम पूर्ण झाले असून इमारतीच्या आतील फिनिंशिग वर्क प्रगतीपथावर आहे.
- सुधारित आराखड्यानुसार टप्पा क्र. १ मधील पुनर्वसन इमारत क्र. ६ मधील ५ विंगचे (बी, सी, डी ,ई व एफ) काम प्रगतीपथावर असून विंग "डी " चे ११ व विंग " एफ " चे १९ मजल्यापर्यंतचे आरसीसी बांधकाम पूर्ण झाले आहे.
- तसेच पुनर्वसन इमारत क्र. ३ चे बांधकाम सुरु करण्याच्या अनुषंगाने चाळ रिक्त करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
- विक्रीयोग्य इमारत क्र.८ च्या भूखंडावरील चाळ क्र. ८, ९, व ११ या तीन चाळी पण जमीनदोस्त करण्यात आले आहेत. तसेच चाळ क्र. १८ व १९ या दोन चाळीचे पाडकाम प्रगतीपथावर असून चाळ क्र.२० रिक्त करण्याचे काम चालू आहे. सदर इमारती मधील विंग 'डी' 'इ' व 'एफ' या ३ निवासी विंगचे काम सुरु करण्याची परवानगी कंत्राटदारास देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे, व त्यानुसार कंत्राटदारास कळविण्यात आले आहे.